Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-II Feb. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ग्रामीण विकासातील सहकाराची भूमिका

प्रा. डॉ. स्मिता कैलास खानापुरे (खुमसे)
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## प्रस्तावना:

भारत देशाला अनेक चळवळीनंतर स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतरही अनेक चळवळी आपल्या देशात चालू राहिल्या त्यापैकी महत्त्वाची चळवळ म्हणजे सहकारी चळवळ. बिना सरकार नाही उध्दार या म्हणीप्रमाणे भारतासारख्या मागास देशात सहकाराशिवाय पर्याय नाही. आज भारत जागतिक स्तरावर १८६ देशापैकी १३६ व्या स्थानावर दारिद्रयाच्या कारणावरून मानवी विकास निर्देशक दिसून येतो. भारत हे कृषी प्रधान राष्ट्र आहे पण याच कृषी विकासाकडे शासनाचे दूर्लक्ष होताना दिसून येते. यासाठी महात्मा गांधी यांनी सांगितलेली सामूहिक शेती हा एक ग्रामीण उत्पादन वाढवून दारिद्रय निर्मूलनाचा एक प्रभावी उपाय आहे त्यामूळे ग्रामीण विकास व दारिद्रय दूर करण्यासाठी आजच्या आधूनिक काळातही सहकारात थोडाफार बदल करुन त्याचा स्विकार करणे आवश्यक आहे.

आजच्या दारिद्रय निर्मूलनातील अपयशाचे कारण म्हणजे परस्पर सहकार्याची भावना आज शासन, जनता, अधिकारी वर्ग यांच्यात दिसून येत नाही त्यामुळे जे श्रीमंत आहेत ते अधिक श्रीमंत बनत आहेत आणि जे दारिद्रयाखाली जिवन जगत आहेत त्यांचे दारिद्रय आणखी वाढतच आहे यावरील उपाय सहकाराच्या माध्यमातून पुढील प्रमाणे सांगता येतील.

## शेतीक्षेत्राचा विकास :

भारतात प्रामुख्याने शेतीक्षेत्राला पतपुरवठा करण्यासाठी सहकारी चळवळ सूरू झाली. सहकारी पतसंस्था या शेतीसाठी अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. शेतकऱ्यांना सुधारीत बी बियाणे, खते, कीटकनाशके पुरवितात. विहीर खोदणे, विदयुत पंप खरेदी, पाईपलाईन, टॅक्टर, अवजारे, इत्यादींच्या खरेदीसाठी अल्पव्याजदराने कर्जे पुरवितात. सहकारी संस्था या पाणी पूरवठयाची सोयही उपलब्ध करून देतात. त्यामुळे शेती उत्पादन वाढते. परिणामी शेती क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते. व त्यातून ग्रामीण विकास होतो.

## औद्योगिक विकास :

कारागीर, लघु व कुटीर उदयोजक एकत्र येऊन औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करतात. या संस्थेमार्फत सभासदांसाठी कच्यामालाची खरेदी व पक्यामालाची विक्री केली जाते. या संस्था लघुउदयोग, कुटिरउद्योगांना चालना देतात. तसेच सहकारीक्षेत्रामुळे शेती पूरक व शेतमालांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा देखील विकास होतो. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरणी, सहकारी तेल गिरणी, सहकारी भात गिरणी, फळप्रक्रिया संस्था, इत्यादी संस्था कार्यरत आहेत. या संस्थामुळे देशातील औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे.

**रोजगार निर्मिती :**

सहकारी क्षेत्रामुळे मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होण्यास मदत होते. सहकारी साखर कारखाने सूत गिरण्या, तेल गिरण्या, इत्यादीमध्ये प्रत्यक्षपणे मोठया प्रमाणावर लोकांना रोजगार उपलब्ध होतो. कोणत्याही सहकारी संस्थेस दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी, संस्थेची ध्येयधोरणे राबवून संस्थेची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी काही सेवकांची गरज असते. अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे रोजगारात वाढ झाली आहे.

**शेतीपुरक व्यवसायांचा विकास :**

शेतकऱ्यांना शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेतीसाठी आवश्यक अवजारे निर्मिती यासारखे पूरक उदयोग करणे सहकारी क्षेत्रामुळे शक्य झाले आहे. दुग्ध उत्पादन हा जोडधंदा सहकारी क्षेत्रामुळे विकसीत झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली आहे.

**शेतमालास योग्य भाव :**

सहकारी संस्था शेतमालास योग्य किंमत मिळवून देतात. विपणनाशी संबंधित सर्व कार्ये उदा. शेतमालाचे एकत्रीकरण, वर्गीकरण, प्रतवारी, बांधणी, साठवणूक, वाहतूक, विक्री, इत्यादी कार्ये सहकारी संस्था करते. शेतमालाची विक्री प्रत्यक्ष ग्राहकांना करते. त्यामुळे शेतमालास योग्य किंमत मिळते. बाजारातील मागणीनुसार मालाचा पुरवठा केल्यानेही चांगला दर मिळतो. काही सहकारी संस्था शेतमालावर प्रक्रिया करून त्यांची उपयुक्तता वाढवितात. त्यामुळे शेतमालाच्या किंमतीत वाढ होते. उदा. ऊसापासून साखर, तेलबियापांसून खाद्यतेल, भातापासून तांदूळ, कापसापासून सूत, फळापासून रस लोणचे - जाम बनविले जाते. शेतमालाच्या उपयुक्ततेत वाढ होऊन शेतमालाची किंमत वाढते परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.

**सावकारी पाशातून मुक्तता :**

भारतात सहकारी चळवळीची सुरूवात होण्यापूर्वी शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे. सावकार अधिक व्याज आकारित व शेतकऱ्यांची फसवणूक करीत असे. सहकाराच्या क्षेत्रात सहकारी पतपुरवठा संस्थाची स्थापना झाल्याने शेतकऱ्यांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा मिळण्याची सोय झाली. त्यामुळे शेतकऱ्यांची सावकारी पाशातून सूटका झाली.

**उत्पादन व उत्पन्नात वाढ :**

सहकारी संस्था या शेतकऱ्यांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्ज पूरवठा करतात. सुधारित बी बीयाणे , खते, आवजारे, किटकनाशके पुरवितात. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढते. सहकारी विपणनसंस्था या शेतमालाला योग्य किंमत मिळवून देतात. शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळाल्याने त्यांचे उत्पन्न वाढते. तसेच सहकारी बँका या उद्योजक, व्यापारी, कारागीर यांना कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करतात. त्यामुळे उत्पादनात वाढ होऊन त्याचे उत्पन्न वाढते.

**मक्तेदारीवर नियंत्रण :**

ग्रामीण भागात सावकार शेतकऱ्यांना भरमसाठ व्याजदराणे कर्ज पुरवठा करतात. सहकारी पतसंस्थेच्या स्थापने मुळे शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज घेण्याची गरज उरली नाही परिणामी सावकारांची मक्तेदारी कमी होण्यास मदत झाली आहे. सहकारी ग्राहक संस्था मूळे वस्तू वितरणातील मध्यस्त व व्यापारांची मक्तेदारी कमी करण्यास मदत झाली आहे. मक्तेदारी कमी झाल्याने मक्तेदारीच्या दुष्परिणामापासून ग्राहकांचे संरक्षण होण्यास मदत झ ाली. कांही वेळा या संस्था वस्तूचे उत्पादन स्वत: करून वाजवी किंमतीत त्या वस्तू ग्राहकांना उपलब्ध करून देतात. अशा प्रकारे सहकारी संस्था मक्तेदारीवर नियंत्रण ठेवतात.

**मध्यस्थांचे उच्चाटन :-**

सहकारी संस्था या थेट उत्पादकांकडून माल खरेदी करून ग्राहकांना विकतात. त्यामुळे मध्यस्त व व्यापाऱ्यांची साखळी दूर होण्यास मदत होते. तसेच कांही सहकारी संस्था शेतमाल विक्रीची कार्यक्षम व्यवस्था करतात. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांना मध्यस्त दलाल यांच्यामार्फत माल विकावा लागत नाही परिणामी मध्यस्त व दलाल यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व पिळवणूक थांबविता येते. प्रत्यक्ष ग्राहकांना वस्तू विकण्याने शेतमालाला योग्य किंमत मिळते. ग्राहकांना ही तुलनेने कमी किंमतीत वस्तू मिळतात. तसेच कारागीर उत्पादकांना ही कच्चा माल खरेदीत आवश्यक सामग्रीची खरेदी, वस्तूंची विक्री इत्यादी साठी मध्यस्त व दलालाची मदत घ्यावी लागते. मध्यस्थ हे अनेक वेळा कारागिरांचे शोषण करतात असे सर्व कारागिर व उत्पादकांच्या सहकारीसंस्था स्थापन करून या मध्यस्थांचे उच्चाटन करतात. अशारीतीने सहकारी संस्था कार्यक्षम उत्पादन व वितरण व्यवस्था निर्माण करून मध्यस्थांची उच्चाटन करण्यास मदत करतात.

अशाप्रकारे ग्रामीण दारिद्रय निर्मुलनामध्ये सहकार महत्त्वाची भूमिका बजवताना दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

- जाधव तुकाराम, महाराष्ट्र वार्षिक-२०१३, युनिक ॲकडमी, पुणे
- धुत, कुलकर्णी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार पिपंळापूरे प्रकाशन, नागपूर-१९६०
- पटवर्धन, नरवाडकर, सहकार तत्व आणि व्यवहार कल्पना प्रकाशन, नादेंड-१९९४
- महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०११-१२
- महाराष्ट्र राज्य सह.आदि.विकास महामंडळ नाशिक -३५९१ वार्षिक अहवाल २००६- ०७
- बिराथर माधव, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्याबुक्स पब्लिशर्स , औरंगाबाद- २०११